PEER REVIEWED &
INDEXED (SJIF) JOURNAL

ISSN : 2319-8643
Impact Factor : 7.139

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

॥ प्रदीपः सर्वविद्यानाम् ॥

**Maharashtra Philosophy Council**
**and**
**Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College, Palghar**

Organized

## Maharashtra Philosophy Council 37th Conference

**Date 1st & 2nd October 2021**



Theme of Conference

## Contemporary Problems and Role of Philosophers

Philosophy of Dr. Amartya Sen ‖ Philosophy of Modern Saint Vai. Sonopant Dandekar

**Executive Editor**
Dr. Kiran Save

**Co-Editor**
Dr. Tanaji Pol
Lt. Anagha Padhye Deshmukh

**Chief Editor**
Mr. Arun B. Godam

www.rjournals.co.in

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 1 , Vol. II
Oct. 2021
Peer Reviewed
SJIF Impact factor
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

Impact Factor – 7.139
ISSN – 2319-8648

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

## Special Issue on
## Contemporay Problem and Role of Philosophers

Philosophy of Dr. Amartya Sen & Philosophy of Modern Saint
Vai. Sonopanth Dandekar

**Oct. 2021**

**Chief Editor**
**Mr. Arun B. Godam**

**Executive Editor**
**Dr. Kiran Save**

**Co-Editors**
**Dr. Tanaji Pol**
**Asst. Prof. Anagha Padhye**

**Shaurya Publication , Latur**

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 1 , Vol. II
Oct. 2021
Peer Reviewed
SJIF Impact factor
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

# Index


| Sr.No. | Ttile of the paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1. | Murray Bookchin's Social Ecology: An Alternative Solution to Ecological Crisis | Dr. Amita Valmiki | 01 |
| 2. | Living the Constitution in a religio-fanatic society; Mahatma Gandhi on democracy and constitution | Dr. Tabassum Sheikh | 05 |
| 3. | A Critical Study of Mahatma Gandhiji as an Iconic Philosopher of the World | Dr. Surendra S. Khandekar | 09 |
| 4. | Justice Theory of Amartya Sen with Reference to the Capability Approach | Dr.Tanaji Pol | 15 |
| 5. | Amartya Sen Philosophy: Key Points on Contributions of Economics | Dr. Yogesh M. Kulkarni | 19 |
| 6. | Philosophical Problem of intolerance with reference to Amartya Sen, Buddha and J. Krishnamurti | Mr. Jivitesh Patil | 25 |
| 7. | वै. सोनोपंत दांडेकर यांच्या विचारविश्वाचा मागोवा–'ज्ञानदेव व प्लेटो' या ग्रंथाच्या अनुषंगाने | डॉ. मीनल कातरणीकर | 28 |
| 8. | तत्त्वज्ञानाचे उपयोजन व उपयोजित तत्त्वज्ञान | डॉ. शर्मिला वीरकर | 34 |
| 9. | तत्त्वज्ञान की अध्यात्मशास्त्र : कै. सोनोपंत दांडेकर | डॉ. हिरीश नवले | 38 |
| 10. | स्त्रियांच्या सबलीकरणाबाबतीत अमर्त्य सेनची भूमिका | डॉ. संगीता पांडे | 47 |
| 11. | तार्किक प्रत्यक्षार्थवादी विचारवंत आणि प्रचितिक्षमतेचे तत्त्व | डॉ. किरण सावे | 51 |
| 12. | लौकिक जीवनातील समस्यांचे तत्त्वज्ञान करणारा तत्त्वज्ञ: संत गाडगे बाबा | डॉ. राजेसाहेब मारडकर | 57 |
| 13. | आधुनिक संत वैकुंठवासी सोनोपंत दांडेकर यांचे तत्त्वज्ञान : व्यक्ती आणि विचार | प्रा. डॉ. शेडगे विजय सोपानराव | 64 |
| 14. | मॅक्स वेबर यांची सामाजिक दर्जानुसार वर्गपद्धती / गटपद्धती | डॉ. सुनिलदत्त एस. गवरे | 69 |
| 15. | बुद्धांच्या अव्याकृत प्रश्नांची तात्त्विक सिद्धता | प्रा. डॉ. अमन बगाडे | 74 |
| 16. | अमर्त्य सेन यांची आर्थिक व तात्त्विक भूमिका | प्रा. डॉ. सचिन खोकले | 77 |
| 17. | पर्यावरणीय समस्या आणि तत्त्ववेत्यांची भूमिका | डॉ. वेदप्रकाश डोणगावकर | 81 |
| 18. | वारकरी संतांचा पर्यावरणाबद्दलचा विचार: एक विवेचन | डॉ. रीना अविनाश पितळे पुराडकर | 85 |

| | | | |
|---|---|---|---|
| 19. | दर्शन: एक तौलनिक अभ्यास | डॉ. रेखा मारोतराव शेरकर | 92 |
| 20. | गांधीप्रणीत शैक्षणिक धोरण आणि त्याची प्रस्तुतता | अनघा अरुण पाध्ये | 95 |
| 21. | संशोधन विषयाची निवड व महत्त्व | प्रा. डॉ प्रभाकर रामलिंग कीर्तनकार | 100 |
| 22. | ग्रामगीतेतील जीवन–शिक्षण संदर्भातील विचार : एक चिंतन | डॉ. धनराज सुभाष हाडुळे | 102 |
| 23. | **महात्मा गांधीचा 'स्त्री' विषयक दृष्टिकोन : चिकित्सक विश्लेषण** | डॉ. शितल रुद्रमुनी येरुळे | 108 |
| 24. | अस्तित्ववादी तत्त्वज्ञ अल्बर्ट काम्यूचा मृत्युविषयक दृष्टिकोन | डॉ. रोहित सुधाकर गायकवाड | 113 |
| 25. | शं. वा. दांडेकर लिखित 'ईश्वरवाद' ग्रंथाचे तात्त्विक विवेचन | डॉ. दर्शना चौधरी | 116 |
| 26. | **स्त्री सक्षमीकरण आणि वास्तव** | प्रा. डॉ. बाजीराव माणिकराव पाटील | 120 |
| 27. | नालंदा विद्यापीठ संपन्न ज्ञानकेंद्राच्या पुनरुभारणीसाठी डॉ. अमर्त्य सेन यांचे योगदान | प्रा. डॉ. शीला गोडबोले पाईकराव | 124 |
| 28. | तत्त्वज्ञान विस्तारातील अडचणी | श्री. अनिल लक्ष्मणराव शिंदे | 128 |
| 29. | महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली झालेल्या चळवळींचे तात्विक आधार | प्रा. संतोष भावार्थे | 130 |
| 30. | स्त्रियांच्या सामाजिक समस्या | प्रा. स्वामी सोनू मन्मथ | 134 |
| 31. | भारतीय शिक्षणप्रणाली आणि स्वामी विवेकानंद यांचे शिक्षणविषयक विचार | श्रीमती सुप्रिया प्रणय राऊत | 137 |

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 1 , Vol. II | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Oct. 2021 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

# शं. वा. दांडेकर लिखित 'ईश्वरवाद' ग्रंथाचे तात्विक विवेचन

**डॉ. दर्शना चौधरी**
सोनोपंत दांडेकर महाविद्यालय पालघर

---

**प्रास्ताविक :**

१८६३ साली प्रसिद्ध झालेला श. वा. दांडेकर लिखित ईश्वरवाद हा ईश्वराविषयीचे मौलिक चिंतन प्रगट करणारा ग्रंथ आहे.

ईश्वराच्या अस्तित्वा संदर्भातील अनेक प्रश्न मानवी मनात निर्माण होतात. त्याची उकल करण्याचा प्रयत्न तत्त्वज्ञान, अध्यात्म व विज्ञान करीत आले आहे. ईश्वर आहे असे जर मानले तर त्यातून आणखी काही प्रश्न उत्पन्न होतात. ईश्वराची कल्पना मनुष्याच्या मनात कशी उत्पन्न झाली? ईश्वर एक आहे की अनेक? ईश्वर सगुण आहे की निर्गुण? ईश्वर आणि विश्व यांचा संबंध कशा प्रकारचा आहे? ईश्वर व ब्रम्ह हे एकच आहे कि भिन्न? धर्म व नीतीशी असलेला ईश्वराचा संबंध यासारख्या अनेक प्रश्नांची चर्चा प्रस्तुत ग्रंथात केली आहे. मात्र ही चर्चा करीत असताना ग्रंथकाराने काही मर्यादा स्पष्ट केल्या आहेत. सर्वच प्रश्नांची सांगोपांग चर्चा न करता पौर्वात्य व पाश्चात्य देशात ईश्वराविषयी प्रश्नांची केलेली चर्चा जिज्ञासूंना समजावी या दृष्टिकोनातून विषय मांडणी केली असल्याचे दांडेकर यांनी नमूद केले आहे.

**विवेचनाची पद्धत**

ईश्वर विषयक प्रश्नांची चर्चा करीत असताना स्वानुभव, शास्त्र प्रामाण्य आणि सारासार विचार करणारी विवेकबुद्धी या तीन पद्धतीपैकी विवेकबुद्धीला प्रमाण मानून वेगवेगळ्या प्रश्नांचा विचार करण्याची पद्धत ग्रंथकाराने अवलंबिली आहे.

पुढील मुद्द्यांच्या अनुषंगाने प्रस्तुत ग्रंथातील ईश्वरवादासंबंधीचे आकलन करून घेता येईल.

**ईश्वर कल्पनेचा उगम**

ईश्वर कल्पनेचा उगम नेमका कसा झाला या संदर्भात आणखी काही प्रश्न उपस्थित केले जातात. मनुष्याने ईश्वराची कल्पना करण्यामागे असलेले कारण? ही कल्पना कोणत्या स्वरूपाची होती? व ती कशी बदलत गेली? ईश्वर कल्पनेचे पृथक्करण केल्यास त्यात कोणते अंश दिसून येतात? यासारखे मानवशास्त्र व समाजशास्त्र या अभ्यास कक्षेत येणारे विषय लेखकाने चर्चिले आहेत. फ्रांस मधील प्रसिद्ध गणिती व तत्त्वज्ञ देकार्त, अनुभववादी तत्त्ववेत्ता लॉक व अमेरिकन तत्त्ववेत्ते जॉर्ज संतयाना यांचे विचार तसेच वेदांत शास्त्रातील सिद्धांत यांचा परामर्ष यासंदर्भात घेतला आहे.

बुद्धीचा जसजसा विकास होत जातो तसे अंतर्बाह्य जगाचे स्वरुप समजू लागते व ईश्वरविषयक ज्ञानातही फरक पडत जातो हे सांगताना इसापनीतीतील गोष्टीचा दाखला दांडेकर देतात.

ईश्वर कल्पनेचा उगम हा माणसाच्या भीतीत असल्याचे मत अनेकांनी मांडले आहे ईश्वर कल्पनेमागे बुद्धीपेक्षा भावना जास्त प्रभावी ठरताना दिसते. मानसशास्त्रज्ञ फ्रॉइड यांनी ईश्वर कल्पनेच्या उगमा संदर्भात केलेल्या मीमांसेचा परामर्श प्रस्तुत ग्रंथात घेतला आहे.

आर्य दर्शनातील ईश्वराची कल्पना स्पष्ट करताना चार्वाक दर्शन, माध्यमिक योगाचार, सौत्रांतिक वैभाषिक या बौद्ध व जैन नास्तिक दर्शनाचा देखील परामर्श लेखकाने घेतला आहे. पाश्चात्य देशातील ईश्वर सिद्धीचे पुरावे देताना देकार्त व कांट यांचा विचार, खंडन मंडन इत्यादी चा आढावा ग्रंथात घेतला आहे.

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 1 , Vol. II
Oct. 2021
Peer Reviewed
SJIF Impact factor
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

## नास्तिकवाद व आस्तिकवाद

ईश्वराविषयी विचार मांडताना नास्तिकवाद व आस्तिकवाद याचे वर्गीकरण देऊन आस्तिकवादाचे अनेक देवतावाद, एकश्रेष्ठ देवतावाद व एकेश्वरवाद असे उपप्रकार दिसतात. त्यापैकी एकेश्वरवादाची चर्चा अधिक झालेली आहे. 'दशांगुले–उरला वाद' हा एकेश्वरी वाद म्हणून प्रसिद्ध आहे. 'दशांगुले–उरला वाद' यानुसार ईश्वर हा जगतात मर्यादित नसून तो जगतात व्यापून त्याशिवाय उरला आहे. म्हणजे तो जगापेक्षा ही व्यापक व अगाध आहे.

## एकेश्वर कल्पना

धर्म आणि ईश्वर याविषयीचे विवेचन करताना वैदिक धर्म, इस्लाम धर्म, पारसी धर्म आणि ईसाई धर्म इत्यादी धर्मामध्ये ईश्वरा संबंधी मानलेली तत्वे स्पष्ट केली आहेत. या धर्मांमध्ये ईश्वर एकच असल्याचे तत्त्व स्वीकारल्याचे दिसते. वैदिक धर्मामध्ये अनेक देवतांची वर्णने व उपासना असल्या तरी 'एकं सन्तं बहुदा कल्पयन्ती' या ऋचेचा दाखला त्यांनी दिला आहे.

## ईश्वरविषयीच्या समजुती

ईश्वरविषयक यथार्थ ज्ञानाच्या आड येणाऱ्या भोळ्या समजुतींचा परामर्श दांडेकरांनी घेतला आहे. अशिक्षितांप्रमाणे सुशिक्षित लोक देखील देवाला संकटसमयी नवस करतात ही बाब देवावर अविश्वास दाखवण्यासारखी आहे असे मत ते व्यक्त करतात; तसेच आपल्या हिताची गोष्ट देवाला करायला लावणे म्हणजे देवालाही अन्याय करायला लावण्यासारखे आहे आणि तसे जर देव करत असेल तर तो देव राहणार नाही. देवाला शरण जाण्यासाठी मध्यस्थाची गरज नाही. असे स्पष्ट मत त्यांनी मांडले आहे.

## ईश्वराच्या अस्तित्वाविषयीचे प्रश्न

भौतिकशास्त्राच्या प्रगतीमुळे देवाच्या अस्तित्वाविषयी प्रश्न उपस्थित होऊ लागले. देवाधर्माच्या भवितव्या बाबत मत प्रगटन होऊ लागले. देव नाकारण्याची मानसिकता तयार होऊ लागली असे असले तरी काही शास्त्रज्ञ मात्र देवाचे अस्तित्व मान्य करताना दिसतात. एडिंग्टन, जीन्स, ए. मॉरिसन, न्यूयॉर्कमधील शास्त्रीय मंडळाचे माजी अध्यक्ष यांनी ईश्वर मानणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले आहे. शास्त्रज्ञ ईश्वरावर विश्वास का ठेवतो याची सात कारणे डंद कवमे दवज `जंदक `सवदम या पुस्तकात दिली आहेत.त्याचाही परामर्ष लेखकाने घेतला आहे. ईश्वराच्या अस्तित्वाविषयीचा प्रश्न योग्य रीतीने मांडला जात नसल्याची खंत देखील व्यक्त केली आहे.

## ईश्वरदर्शन विषयक विचार

ईश्वरदर्शन विषयी दांडेकरांनी विस्तृत विवेचन केले आहे. ईश्वर मानणारा मोठा वर्ग असला तरी ईश्वर भेटावे अशी तळमळ असणारे मात्र खूप कमी सापडतील हे सांगताना तुकारामांच्या एका प्रसिद्ध अभंगाचा दाखला दिला आहे. 'देव घ्या फुका देव घ्या फुकाद्य नलगे रुका मोल काहीद्यद्य'

ईश्वरदर्शन हे दुर्लभ असून साक्षात्काराचा मार्ग कठीण आहे. मनुष्याच्या ठिकाणी असलेला प्रापंचिक विषय भोग परमेश्वर भेटीची तळमळ मनात निर्माण होऊ देत नाही. आणि परमेश्वर भेटीची तळमळ मनात निर्माण झाली तरी त्याला योग्य मार्गदर्शन करणारा गुरू भेटावा लागतो. असे ते आवर्जून सांगतात. मात्र गुरु भेटला म्हणजे झाले असेही नाही.कारण परमार्थ ही ज्याच्या त्यानेच करायची बाब आहे. गुरु हा मार्ग दाखवू शकतो पण त्यावर मार्गक्रमण साधकालाच करावी लागते. असा विचार ते मांडताना दिसतात.

परमार्थिक साधन म्हणून ध्यानाचे असलेले महत्त्व दांडेकरांनी उपनिषदापासून ज्ञानेश्वरादी संतांनी वर्णन केलेल्या ओवी अभंगांचे संदर्भ देत स्पष्ट केले आहे. ईश्वरदर्शन

होण्यासाठी दिव्यदृष्टी प्राप्त झाली पाहिजे व ती ईश्वरकृपेने होऊ शकते असा विचार ते मांडतात. ईश्वरदर्शन झाल्यानंतर जी स्थिती प्राप्त होते त्यास ब्रह्मस्थिती असे संबोधले जात असून ब्रह्मस्थिती प्राप्त होतानाचे सुख व त्यानंतर होणारी अवस्था त्यांनी ज्ञानेश्वरांच्या शब्दात मांडली आहे.

ईश्वरदर्शनाचा विचार मांडत असताना साधक साधना करीत असताना ज्या अवस्थांमधून जातो त्या अवस्थांचा विचार व साधनांमधील प्रार्थनेचा विचार यांना दांडेकरांनी महत्त्व दिलेले आहे. साधक ज्या अवस्थेमधून जातो त्या अवस्थांची पद्धतशीर मांडणी पाश्चात्त्य देशांमध्ये झाले असली तरी आपल्याकडील साधू संतांची चरित्रे व त्यांचे वांग्मय यामधून देखील या संदर्भातील विचार मांडला गेल्याचे मत ते नोंदवतात. मराठीमध्ये प्रथम गुरुवर्य रानडे यांनी संतवांग्मयाचा मानसशास्त्रदृष्ट्या अभ्यास करून यासंदर्भात विवेचन केले आहे. विल्यम जेम्स आणि मिस अंडरहील यासारखे पाश्चात्य लेखक लेखिका यांच्या ग्रंथांचा उल्लेख ते आवर्जून करतात. पाश्चात्त्य अभ्यासकांनी या अवस्थेचे वर्णन पुढील चार प्रकारे केले आहे.

Awakening of the self आत्म जागृती
Dark night of the soul आत्माविषयक अंधारी रात्र
Illumination प्रकाश
Unitize Experience स्वरूपसमरसतेचा अनुभव

याच अवस्था संतवांग्मयातही आढळतात असे सांगून तुकाराम महाराजांच्या अभंगांचा दाखला त्यांनी दिला आहे.

**प्रार्थनेचे महत्त्व**

प्रार्थना या साधनाचा परामर्श त्यांनी स्वतंत्र प्रकरणात घेतला आहे. प्रार्थनेच्या प्रकारांचा तक्ता देऊन १०० पैकी ९० प्रार्थना या कामिक किंवा सहेतुक असल्याचे ते सांगतात. देवाला अंतकरणाची भाषा समजत असून कळकळीने केलेली प्रार्थना तो ऐकतो. व्यक्तीने केलेली प्रार्थना व सामुदायिक प्रार्थना याबद्दलचे विचार त्यांनी मांडले आहेत. परिशिष्टात विविध धर्माच्या प्रार्थना देखील त्यांनी दिल्या आहेत.

**निष्कर्ष**

- वरील सर्व विवेचनावरून शं. वा. दांडेकर यांचे पाश्चात्य तत्त्ववेत्ते व मानसशास्त्रज्ञ यांच्या ग्रंथाविषयी असलेले ज्ञान व संत साहित्याचा असलेला व्यासंग याची प्रचिती येते.
- ईश्वराचे अस्तित्व मान्य करून प्रस्तुत ग्रंथात ईश्वरवादासंबंधी विचार मांडले आहेत.
- सर्व धर्मामध्ये ईश्वर एकच असल्याचे तत्त्व स्वीकारले आहे. वैदिक धर्मात ब्रह्माचा मांडलेला विचार हा एकेश्वरवादाला जवळ जाणारा आहे.
- देव नवसाला पावतो यासारख्या भोळ्या समजुती बाळगणे योग्य नाही.
- देवाला शरण जाण्यासाठी मध्यस्थाची गरज नाही.
- भौतिकशास्त्राच्या प्रगतीमुळे देवाच्या अस्तित्वाविषयी प्रश्न निर्माण केले जात असले तरी अनेक वैज्ञानिक मात्र देवाचे अस्तित्व मान्य करतात.
- ईश्वर भेटीची तळमळ असल्याशिवाय ईश्वरदर्शन होत नाही व त्यासाठी दिव्यदृष्टीची आवश्यकता आहे.

- साक्षात्काराच्या मार्गावर जाताना योग्य गुरुची आवश्यकता साधकाला भासते मात्र अंतिम मार्गक्रमण हे साधकालाच करावे लागते.
- ईश्वरदर्शनाच्या मार्गात प्रार्थनेचे असलेले महत्त्व निर्विवाद आहे.

**संदर्भ**

१.दांडेकर शं. वा. : ईश्वरवाद, दुसरी आवृत्ती, प्रसाद प्रकाशन, सदाशिव पेठ पुणे, शके १८८२,पृष्ठ 200




OUR MISSION
"TO SPREAD OF HIGHER EDUCATION IN RURAL AND TRIBAL YOUTH AND SPECIALLY THE WOMEN FOLK."

OUR GOAL
"TO PROVIDE HIGHER AND BETTER EDUCATION TO ALL."


PEER REVIEWED & INDEXED (SJIF) JOURNAL

ISSN : 2319-8648
Impact Factor : 7.139

# Current Global Reviewer

Peer Reviewed International Referred Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

www.rjournals.co.in